
ISSN 2582-5429 (online)

# AKSHARA

## Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal
July-September 2020 Vol.02 ISSUE. II (B)




# Modern Trends in Literature

MARATHI | HINDI | ENGLISH

Guest Editor
Dr.Smt. S. M. Sonawane
Acting Principal
Arts, Commerce & Science College,
Yawal Dist. Jalgaon, Maharashtra

Associate Editor
Dr.Smt. S. M.Kharate Dr.S.P.Kapade Dr.P.V.Pawara
Arts, Commerce & Science College, Yawal
Dist. Jalgaon, Maharashtra

Chief Editor : **Dr. Girish S. Koli**, AMRJ, Yawal

For Details Visit To – www.aimrj.com

Akshara Publication

ISSN 2582-5429(online)

**Akshara Multidisciplinary Research Journal**

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

July-September 2020 VOL.02. ISSUE II (B)

*Modern Trends in Literature*
*(Marathi, Hindi & English)*

www.aimrj.com
Email ID. aimrj18@gmail.com

# Index


| Sr.No | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | मराठी विभाग | | |
| 01 | भारतीय परिप्रेक्ष्य आणि दलित साहित्याचा प्रभाव आणि महत्व' (मराठी आणि हिंदी साहित्याच्या संदर्भात) | राजीव के.आरके | 04-09 |
| 02 | आदिवासी संस्कृती आणि लोकनृत्य: एक अनुबंध | प्रा.डॉ. सुनील मधुकर पवार | 10-13 |
| 03 | १९९० नंतरची आधुनिक स्त्रीवादी कथा | डॉ. अनिल बळीराम बांगर | 14-19 |
| 04 | विज्ञान साहित्य: आधुनिक साहित्य प्रवाह | डॉ.वंदना लव्हाळे | 20-24 |
| 05 | आदिवासी: लोकसंस्कृती आणि समाजजीवन | प्रा. डॉ. पंकज रघुनाथ देवरे | 25-28 |
| 06 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार आजच्या काळासाठी प्रेरक | मधुचंद्र लक्ष्मण भुसारे | 29-31 |
| 07 | स्त्रीवाद आणि महिला सबलीकरण | डॉ. सुदर्शन दिवसे | 32-39 |
| 08 | आदिवासी "वारली" समाज व त्यांची बोलीभाषा | डॉ हेमलता युं. मुकणे. | 40-44 |
| 09 | फेस बुक कवितेतील मजूर | डॉ. गिरीश मोरे | 45-50 |
| 10 | विभावरी शिरुरकर यांच्या कळ्यांचे निःश्वास या कथासंग्रहातील स्त्री जीवन | प्रा.डॉ. आहिरे संगिता मुरलीधर | 51-55 |
| 11 | स्त्रीवादी मराठी आत्मकथने बदलते आयाम | डॉ. वंदना रवींद्र बडगुजर | 56-58 |
| | हिंदी विभाग | | |
| 12 | धार उपन्यास में मानवी जीवन मूल्यों का विघटन | प्रा. डॉ.अशोक दौलत तायडे | 59-61 |
| 13 | ओमप्रकाश वाल्मीकि की कहानियों में चित्रित दलित क्रांति चेतना | डॉ. खरटसोल मदन तासदेव | 62-68 |
| 14 | संत नामदेव के हिंदी मराठी अभंग | डॉ.मल्लिनाथ बिराजदार | 69-73 |
| 15 | 21 वी सदी के प्रथम दशक के हिंदी उपन्यास साहित्य में विविध चुनौतियाँ | डॉ. मनिषा गंगाराम मुगळीकर | 74-76 |
| 16 | हिंदी साहित्य में चित्रित आदिवासी विमर्श | डॉ. प्रल्हाद विजयसिंग पावरा | 77-82 |


©Copyright 2020 *AMRJ*. All Rights Reserved

ISSN 2582-5429(online)

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
July-September 2020 VOL.02. ISSUE II (B)

*Modern Trends in Literature*
*(Marathi, Hindi & English)*

www.aimrj.com
Email ID. aimrj18@gmail.com

# १९९० नंतरची आधुनिक स्त्रीवादी कथा

डॉ. अनिल बळीराम बांगर
(मराठी विभाग प्रमुख)
को.ए.सो. लक्ष्मी-शालिनी महिला महाविद्यालय-पेझारी, ता. अलिबाग, जि. रायगड
भ्रमणध्वनी : ९०२८०९२१११

---

**प्रास्ताविक:**

साहित्य हे समाजाचे अपत्य असते.साहित्याची निर्मितीजरी एक व्यक्ती करीत असली तरी त्या साहित्यकृतीसाठी आवश्यक असणाऱ्या घटकांची सामग्री त्याला समाजातच मिळत असते.साहित्याची निर्मिती विशिष्ट स्थलकालबद्ध सामाजिक,सांस्कृतिक वातावरणात होत असते.म्हणजेचसाहित्याची निर्मिती,विकास आणि वाढ ही समाजातच होत असते.साहित्य समाजातच निर्माण होते.अशा या साहित्याची विभागणी गद्य व पद्य या दोन विभागात केली जाते.परंतु पद्य वाड्.मयास प्राचीन परंपरा लाभलेली आहे.पण गद्यवाड्.मय मात्र इंग्रजी कालखंडात विकसित झाले.इंग्रजी काळातच कथा,कादंबरी,नाटक,निबंध असे वाड्.मयप्रकार अस्तित्वात आले.परंतुइंग्रजी कालखंडात शिक्षणाचा प्रसार झाला,तळागाळातील समाज जागृत झाला.त्यांना 'स्व' ची जाणीव होऊ लागली.या जाणिवेने १९६० नंतर मराठी साहित्यात विविध प्रवाह निर्माण झाले.आणखी एक कारण म्हणजे देशाला स्वातंत्र्य मिळाले खरे पण स्वातंत्र्यपूर्व काळात देशातील लोकांनी पाहिलेली स्वप्ने भंग पावली होती.या सर्वांचे चित्रण मराठी साहित्यातून होऊ लागले.

१९६० नंतर मराठी साहित्यात अनेक प्रवाह उदयास आलेत्या प्रवाहामध्ये 'स्त्रीवादी साहित्य' हा प्रवाह महत्वपूर्ण ठरला.कारणस्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रियांनी साहित्यनिर्मिती करण्यास सुरुवात केली होती.याच काळातकाही आत्मचरित्रे आणि कथासंग्रह प्रकाशित झाले होते.परंतु हे लेखन रूढ चाकोरीतून झालेले होते. पतीला परमेश्वर मानून त्याच्या पायावरलीन होण्यात, जन्माचे सार्थक मानणाऱ्या स्त्रीने याच दृष्टीकोनातून आपले लेखन केले.१९६० नंतर मात्र यादृष्टीकोनात आमूलाग्र बदल झाला.कारण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समाजसुधारकांनी केलेल्या कार्यामुळे स्त्री स्वतंत्र झाली होती.ती शिकू लागली होती पुरुषी वर्चस्वाखाली दडपलेल्या आपल्या स्त्रीत्वाची,हक्काची जाणीव झाली.आणि ती आपल्या दबलेल्या भावनांना वाचा फोडण्यासाठी मार्ग शोधू लागली होती.तेव्हा ती सुद्धा साहित्य निर्मिती करू लागली.त्यातूनच स्त्रीवादी साहित्याचा उगम व विकास झाला.

**स्त्रीवाद : व्याख्या व स्वरूप :**

आपल्या समाजात लिंगभेदावर आधारित दोन घटक आहेत.स्त्री व पुरुष 'स्त्रीवादी साहित्य'म्हणजे काय हे समजून घेताना काही संज्ञाचे अर्थ स्पष्ट व्हावेलागतात. फिमेल म्हणजे स्त्री, फेमिनिझम म्हणजे स्त्रीप्रधान,फेमिनिस्ट म्हणजे स्त्रीवादी होय.एखादी कलाकृती स्त्रीने लिहिली म्हणून ती स्त्रीवादी ठरत नाही.उलट बहुतांस स्त्री लेखिका पुरुष प्रधान संस्कृतीने निर्माण केलेल्या पद्धतीने लेखन करताना दिसतात.

आर्थिक, सामाजिक,राजकीय व इतर कोणत्याही प्रणालीचा विचार केला तर स्त्रीवाद म्हणजेनेमके काय? असा प्रश्न पडतो.कारण पुरुष प्रधान समाजव्यवस्थेत पुरुषाचे वर्चस्व आणि स्त्रीला दुय्यमत्व

ISSN 2582-5429(onl

**Akshara Multidisciplinary Research Journal**

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

July-September 2020 VOL.02. ISSUE II (B)

*Modern Trends in Literature*
*(Marathi, Hindi & English)*

www.aimrj.com
Email ID. aimrj18@gmail.com

असे समीकरण असल्याने हा प्रश्न निर्माण होतो.सरळ,साध्या,सोप्या भाषेत असे म्हणता येईल की, 'स्त्रियांच्या एकूणच जीवनाविषयी समाजापुढे निर्माण झालेले प्रश्न-उपप्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारी मतप्रणाली म्हणजे स्त्रीवाद होय.' या विचारसरणीचा उगम ही काळाची गरज आहे.स्त्रीमुक्तीची चळवळ ही प्रामुख्याने पुरुष प्रधान संस्कृतीचा निषेध करू पाहतेय.निसर्गाने स्त्रीला एक अलौकिक संवेदना बहाल केली आहे.ती संवेदनक्षमता,समाज नस्ट करू पाहतोय म्हणून स्त्रीची अवस्था दिवसेदिवस दयनीय होत चाललेली आहे.भारतीय स्त्री ही रूढीप्रधान व बुरसटलेल्या मनोवृत्तीची ती भक्ष्य बनली आहे.तिची अस्मिता जागृत करणारी विचारसरणी म्हणजेच स्त्रीवाद असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

"स्त्रीने पुरुषाची गुलामगिरी नाकारली तर समाज तिला लाथाडतो,स्वीकारली तर कुटुंबात तिचा छळवाद सुरु होतो.मुक्या,पाळीव प्राण्यांसारखी अवस्था आजहीस्त्रियांना भोगावी लागते. हे कटू सत्य आहे.ग्रामीण भागातील स्त्री-पुरुषांच्या बरोबरीने कावाडकस्ट करून द्रव्यार्जन करत असते.अशा सैद्धांतिक भूमिकेत स्त्रीला जगणं शक्य आहे का? पण अशी शक्यता निर्माण करणं हेच स्त्रीवादाच खरं क्षेत्र आहे."०१ प्रस्थापित विचार तथाकथित संकल्पना लादून व्यवस्थेने तिच्या व्यक्तिमत्वाला साचेबंध केले.ही अवस्था निर्माण करण्यासाठीविविध स्तरावरआणि विविधप्रकारे केल्या जाणाऱ्या लिंगभेदाधिष्टित राजकारणाविरुद्ध संघर्षशील बनलेलीकृतीशील विचारधारा म्हणजे स्त्रीवाद होय. यावरून काही विचारवंतांच्या व्याख्यांचा विचार करता येईल.

"सिमॉन दि बुव्हा यांच्या मते, 'स्त्रीवाद'म्हणजे केवळ स्त्रीहक्काचे समर्थन नव्हेतर स्त्रीची, 'स्त्री'ओळख करून देणे.स्त्री प्रश्नाप्रती आस्था निर्माण करणे."०२

"फिमेल– म्हणजे स्त्री,फेमिनिझम – म्हणजे स्त्रीप्राधान्य,फेमिनिस्ट– म्हणजे स्त्रीवादी विचारधारा. या विवेचनाच्या आधारावर समानतेच्या तत्वाचा पुरस्कार करीत स्त्रीजीवन विचारांनाप्राधान्य देणारा प्रवाह म्हणजे स्त्रीवाद होय."०३

वरील व्याख्यांचे परिशीलन केल्यास असे म्हणता येईल की,स्त्रियांच्या स्त्रीत्वासाठी कुटुंबातील स्थान स्वत:च्या शरीरावर हक्क आणि राजकीय,सामजिक,आर्थिक,शैक्षणिक,कौटुंबिक इ. क्षेत्रातील समानता मिळविण्यासाठी स्त्रियांनी प्रचलित समाज व्यवस्थेविरुद्ध केलेला संघर्ष – म्हणजे स्त्रीवाद होय.मानवी संबंध व्यवस्थेच्या मुळापासून वेध घेणारी स्त्रीवाद ही एक राजकीय विचारप्रणालीआहे.नवसमाज निर्मितीसाठी शोषणाची कारणे शोधणे आणि स्त्रीअस्मितेचा पुरस्कार करणाऱ्या, नव्या मर्यादांची मांडणी करणे हे स्त्रीवादाचे स्वरूप आहे.

१९९० नंतरची कथा :

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी अव्याहतपणे आपआपले कार्यकर्तृत्व निष्ठेने बजावलेले आहे. त्यांच्यास्वातंत्र्याचे पंख छाटून टाळण्याला डाव मांडूनही त्यांनी अगदी चूलमूल सांभाळणे पासून तर देश सांभाळण्यापर्यंत मजल मारली आहे.

१९९० नंतरच्या कालखंडातील कथात्मक लेखनाचा विचार करता, केवळ स्त्रियांनी लिहिलेल्या नव्हे; तर स्त्रियांनी आणि पुरुषांनी स्त्रीवादी भूमिकेतून लिहिलेल्या कथा महत्वपूर्ण ठरतात. भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना देवू केलेले कायदेशीर हक्क, परदेशातील स्त्री-मुक्तीची चळवळ, या चळवळीचे या देशात विशेषतः महाराष्ट्रात उमटलेले पडसाद, दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातले बदललेले समाजजीवन, शहरीकरण, यंत्रयुग, विभक्त कुटुंबपद्धती, स्त्रियांचे उच्चशिक्षण, अर्थार्जन,

ISSN 2582-5429(online)

AMRJ

*Akshara Multidisciplinary Research Journal*

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

July-September 2020 VOL.02. ISSUE II (B)

*Modern Trends in Literature*

*(Marathi, Hindi & English)*

www.aimrj.com

Email ID. aimrj18@gmail.com

व्यक्तिस्वातंत्र्यवाद, आधुनिक जीवनाबरोबरीने आलेली ऐहिक सुखे आणि मानसिक ताणतणाव, स्पर्धा, संघर्ष हे सर्व समग्र वास्तव जमेस धरून स्त्रियांच्या कथेचा विचार करणे इष्ट ठरते. त्याचबरोबर याच वास्तवाच्या साक्षीने मराठी कथेच्या प्रांतात आरंभी कुसमावती देशपांडे, वसुंधरा पटवर्धन, विजया राजाध्यक्ष, कमल देसाई, वसुधा पाटील, आंबिका सरकार यासारख्या आणि नंतर गौरी देशपांडे, सानिया, उर्मिया पवार, आशा बगे ह्यासारख्या ज्या प्रिया तेंडुलकरांना समकालीन ठरतात अशा अनेक महत्वाच्या स्त्री कथाकारांनी मराठी कथेच्या बाबतीत वैविध्यपूर्ण आणि सकस, सक्षम भर घातलेली आहे याची नोंद घेणेही क्रमप्राप्त आहे.

स्त्रीच्या दुःखाचं मूळ विवाहसंस्थेत आहे आणि ही विवाहसंस्था पुरुषांच्या अंकित आहे. त्यामुळेच समस्त भारतीय स्त्रियांच्या वाट्याला केवळ दुःख, भोग आले आहेत अशी प्रिया तेंडूलकर यांची धारणा असावी. त्यांच्या बहुतेक कथेतआधुनिक, मिळवत्या, स्वतंत्रव्यक्तिमत्वअसणाऱ्यानायिकांना अरेरावी करणारे, तुच्छ लेखणारे, अपमानास्पदवागणूक देणारे पुरुष भेटतात. आधुनिक जगातसुद्धा स्त्री किती पुरुषावलंबी आहे, याचे चित्रण केले आहे. त्यांच्या'लग्न संपल्यावर' (चौकट, १९९१) कथेतीलनायिका लग्न म्हणजे काय? याचा सखोलपणे विचार करते.

प्रिया तेंडुलकरांच्या'घसरण' कथेतील नायिका विवाहसंस्थेसंबंधी म्हणते, "विवाह संस्था नैसर्गिक नाही. माणसाने घडवलेली आहे आणि म्हणूनच ती अनैसर्गिक आहे. कृत्रिम आहे. मॅरेज इजमॅनमेड. हेन्स सिंथेटिक. कृत्रिम आहे. ती बदलणं शक्य आहे. स्त्रीचं शोषण करणारी हि व्यवस्था बदलली पाहिजे अशी प्रिया तेंडूलकर यांची दृष्टी दिसून येते.

१९९८ मध्ये स्त्री विश्वाशी निगडीत असलेल्या 'मिळून साऱ्याजणी' या नियतकालिकाने विवाहसंस्थेविषयी काढलेल्या विशेषांकात 'लग्नसंस्थेची आवश्यकता' या लेखात स्त्री अभ्यासिका मंगला आठलेकर म्हणतात, "लग्न म्हणजे बांधिलकी. लग्न म्हणजे पुरुषाच्या मनात जागी होणारी मालकी हक्काची जाणीव. हि जाणीव नाहीशी करायची असेल तर लग्नसंस्थाच मुलभूत नाकारली पाहिजे, स्त्री-पुरुषांनी विवाह विधीशिवाय विवाहित स्त्री-पुरुषांसारख एकत्र रहावं, म्हणजे कुणी मालक असणार नाही आणि कुणीही गुलाम असणार नाही.वैवाहिक आयुष्यातील जाचाला पर्याय म्हणून अशा तऱ्हेचा एक प्रतिक्रियात्मक विचार स्त्रिया करू लागल्या तर नवल नाही."०४

मंगला आठलेकरांनी सूचित केलेल्या वरील पर्यायासारखाच दृष्टीकोन मनामध्ये ठेवून गौरी देशपांडे यांनी विवाहसंस्थेविषयी बंडखोर, स्वतंत्र विचार मांडण्याचा प्रयत्न काही कथांतून केलेला आहे. मराठी कथाविश्वाला हा विचार पूर्णतः नवा आहे 'ओहोटी' (आहे हे असं आहे, १९८६) या कथेत विवाह न करता एकत्र राहणाऱ्या स्त्री-पुरूषांचं चित्रण येते. या कथेतील राम आणि सोना विवाह नाकारून समविचाराने एकत्र राहात असतात. बाह्यतः आधुनिक विचाराचा म्हणविला जाणारा रामसुद्धा सोनाला फसवून गुपचूप एका स्त्रीशी विवाहबद्ध होतो, सोनालाही बातमी दुसऱ्याकडून कळते तेव्हा सोना भारतीय स्त्रीसारखी आक्रस्ताळेपणा किंवात्रागा न करता आपल्या संबंधाचा फेरविचार करते. रामच्या लग्नाविषयी चिडून न जाता ती समंजस भूमिका घेते. पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये आधुनिक विचारांचे पुरुषसुद्धा स्त्रियांची कशी फसवणूक करतात याचे चित्रण या कथेत येते. विवाह संस्था नाकारणारी, स्त्री-पुरुष सहजीवनाला प्राधान्य देणारी स्त्री, गौरी देशपांडे यांनी चित्रित केली आहे. परंपरागत विवाहाचे रूप झुगारून देऊन, प्रेमाला प्राधान्य देऊन, विवाह संस्थेला आव्हान देणारी गौरी देशपांडेंची नायिका मराठी कथाविश्वात आगळीवेगळी वाटते.

©Copyright 2020 *AMRJ*. All Rights Reserved

ISSN 2582-5429(online)

Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

July-September 2020 VOL.02. ISSUE II (B)

Modern Trends in Literature

(Marathi, Hindi & English)

www.aimrj.com

Email ID. aimrj18@gmail.com

विजया राजाध्यक्ष यांच्या 'जानकी देसाईचे प्रश्न' (अन्वयार्थ, २००१) या कथेत विवाह ण करता एकत्र राहणाऱ्या स्त्री-पुरुषांचे चीत्रन येते. सुखवस्तू आणि आधुनिक वातावरणात लहानाची मोठी झालेली जानकी शिक्षण संपल्यानंतर लग्न ण करता सुजित बॅनर्जी या मित्रावरोबर लग्नाशिवाय एकत्र राहण्याचाधाडसी निर्णय घेते. परंतु भारतीय समाजव्यवस्थेमध्ये लग्नाशिवाय एकत्र राहणे फार काळ टिकत नाही. दोघांतल्या विशुद्ध मैत्रभावाकडेही समाजशंकेने पाहतो. जानकीला मूळ हवे असते. परंतु सुजितला मुलाची जबाबदारी नको असते. शिवाय या मुलाकडे समाज कोणत्या दृष्टीने पाहील, त्यामुळे त्याला पुढे त्रास होईल का, असे प्रश्न तो उपस्थित करतो. परंतु जानकी आतून येणारी उर्मी दाबून ठेवू शकत नाही."कोणत्याही भूमिकेत स्त्रीला आपले स्त्रीपण विसरता येत नाही. त्या स्त्रीपणातस्थैर्याची ओढ सामावलेली आहे. कुटुंब, मुले या सगळ्या गोष्टी तिला हव्या असतात."विवाहाशिवाय जानकीला हवे असलेले स्थैर्य आपल्या समाजव्यवस्थेत लाभू शकत नाही. त्यामुळे आजही विवाह संस्थेचे महत्व तितकेच अबाधित राहिलेले दिसून येते. विवाह संस्थेचे महत्व तितकेच अवाधित राहिलेले दिसून येते. विवाह संस्था मोडीत काढून स्त्री-पुरुषांचे मैत्रशील सहजीवन अशक्यही वाटते.

गौरी देशपांडे यांनी विवाहसंस्थेविषयक बंडखोर आणि टोकाची भूमिका घेऊन कथालेखन केलेले असले तरी विवाहामुळेच स्त्री-पुरुषांच्या जीवनाला अर्थ प्राप्त होतो, सुरक्षितता लाभते असे विचार मांडले आहेत. "विवाहसंस्था: एक पुनर्विचार" या लेखात त्या म्हणतात, "स्त्रियांच्या लेखी विवाह ही एक सामाजिक गरज आहे. ज्या स्त्रियांना स्वतःचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य आहे आणि त्यांनी मनासारखा जोडीदार निवडलाय त्यांनाही समाजमान्य 'विवाह'च्या चौकटीतच सुरक्षित वाटते."०५ परंतु विवाहातील सुरक्षितता म्हणजे पारंपारिक पुरुषप्रधान व्यवस्थेचं जोखड स्त्रीवर लादणे असे नाही. विवाह म्हणजे स्त्री-पुरुषांचे सहजीवन हा दृष्टीकोन त्या मानताना दिसतात. 'देणं' (आहे हे असं आहे, १९८६) या कथेची नायिका अनिता सिंग मुळची अमेरिकन आहे. भारतीय साजन सिंगशी ती विवाहबद्ध होते. पण जेव्हा मूल नको असताना दिवस जातात तेव्हा ती गर्भपात करण्याचा निर्णय घेते. परंतुसाजनचा त्याला विरोध होतो. पत्नीच्या विचाराने त्याच्या आनंदावर विरजण पडते. तिला तसे करण्याविषयी गयावया करतो. मात्र ती त्याच्या मनाप्रमाणे वागण्याचे नाकारते आणि म्हणते, "तुझ्या देशात बायकांना मुलं निर्मिण्याची यंत्रं समजत असतील फार तर, पण मी अमेरिकन आहे हे विसरू नकोस! केवळ मादी म्हणूत जगात माझंव्यक्तिमत्व, बुद्धी सारं गुंडाळून नाही ठेवायचं मला, मुलाला जन्म केव्हा द्यायचा, किंवा तो द्यायचा की नाही हे सर्वस्वी मी ठरवणार, समजलास? यात भावनाविवश होण्यासारखं काय आहे ? मूल, मूल कसलं ? तो नुसता काही पेशांचा ठिपका आहे."

भारतासारख्या संस्कृतीप्रधान देशात संसारामध्ये पुरुषप्राबल्याने निर्णय होत असतात. परंतु निर्णयप्रक्रियेत स्त्रीचंही महत्व गृहीत धरायला हवे, स्त्रीला समजून घ्यायला हवे, असे गौरी देशपांडे यांना सूचित करायचे आहे. ती स्वतंत्र विचार करणारी असली तरी सुरुवातीला गर्भ पाडू इच्छिणारी अनिता साजनसिंगचा अपघात मृत्यू झाल्यानंतर मात्र त्याचा गर्भ वाढवू इच्छिते. विवाहसंस्थेचे वेगळे रूप त्यांनी चित्रित केले आहे. गौरी देशपांडे मुळात स्त्रीवादी दृष्टीने लेखन करणाऱ्या आघाडीच्या कथालेखिका आहेत. त्यांची वैचारिक पार्श्वभूमी ठाम आहे. त्यामुळेस्त्री-पुरुष संदर्भातील पारंपारिक विचाराला छेद देत त्या नवा स्त्रीवादी दृष्टीकोन रुजवितांना दिसतात. स्वतंत्र व मुक्त जीवन जगू इच्छिणारी स्त्री त्यांच्या कथांतून चित्रित होते. स्त्री विश्वाच्या अनुभूतीचे वैशिष्ट्यपूर्ण नावीन्य अविष्कृत करणे हा त्यांच्या कथांचा प्रकृतिधर्म आहे.

©Copyright 2020 AMRJ. All Rights Reserved

ISSN 2582-5429(online)

AMRJ

Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

July-September 2020 VOL.02. ISSUE II (B)

Modern Trends in Literature
(Marathi, Hindi & English)

www.aimrj.com
Email ID. aimrj18@gmail.com

सानियायांच्या नायिका सुशिक्षित असूनही त्या चारचौघीसारख्या नाहीत. रूढ चाकोरीहून वेगळं जीवन व्यतीत करणाऱ्या आणि झपाटल्यासारख्या वागणाऱ्या आहेत. 'पुन्हा एकदा जन्म' कथेतील मीरा जीवनामध्ये काही वेगळा प्रयोग करणारी आहे.

सानिया यांच्या कथेतून विवाहसंस्थेच्या माध्यमातून दुखी असलेली स्त्री भेटत नाही. उलट तिने घेतलेले काही धाडसी निर्णयच तिच्या दुःखाला जबाबदार असतात. विवाहसंस्थासारख्या बाबीवर त्या भाष्य करत नाहीत. त्यातील अपप्रवृत्तीवर त्या बोलत नाहीत. अथवा विवाहसंस्थेविरुद्ध बंड करणाऱ्या नायिकाही त्यांच्या कथांमध्ये आढळत नाहीत. सानिया यांच्या कथेविषयी अनिरुद्ध कुलकर्णी म्हणतात, "सानिया यांचे कथालेखन काही ठाशीव वैचारिक भूमिका मनात ठेवून झालेले नाही. समूह प्रश्नाचा विचार ते करत नाही. सुटा माणूस आणि त्याच्या भावविश्वातील गुंतागुंत प्रत्यक्ष घटनांपेक्षात्यांचे अन्वयार्थ, त्या माणसांनी घटनांचा स्वीकार ज्या पद्धतीने केला असेल त्या पद्धतीला सानियांच्या कथेत महत्व आहे."०६ म्हणून सानिया यांची कथा ही स्त्री-समूह केंद्री न वाटताव्यक्ति केंद्री वाटते. स्त्री-प्रश्नांच्या सामाजिकतेच्या पार्श्वभूमीवर त्या फारसा विचार करत नाहीत. व्यक्तींच्या जीवनातील गुंतागुंत आणि भावस्थिती यावरच त्या भर देताना दिसून येतात.

आधुनिक काळातील स्त्रीप्रियातेंडूलकरांच्याकथांच्या केंद्रस्थानी आहे. आत्मनिर्भर होऊ पाहणारी, व्यक्तिस्वातंत्र्याची ओढ असलेली, भोवतीच्या पुरुषप्रधान समाजव्यवस्थेतील व्यवहाराने जिची शारीरिक, मानसिक, आर्थिक कोंडी झालेली आहे. अशी स्त्री आणि तिच्या समस्या यांचे चित्रण त्यांच्या कथांत आढळते. स्त्रीमनाला असलेली प्रेमाची ओढ आणि त्यापायी होणारे तिचे शोषण, स्त्रीच्या वाट्याला आलेल्या भूमिका, त्या निभावताना होणारी तिची तडफड, असहायता आणि त्यातून बाहेर पडणे. तिने केलेली बंडखोरी प्रिया तेंडुलकरांनी प्रभावीपणे आणि असांकेतिकरीतीने प्रकट केली आहे. कुटुंबसंस्थेकडून होणारे स्त्रीचे शोषण आणि कुचंबणा व्यक्त करताना त्यांची कथा जणू समाजाला सरळ सरळ सवाल करते. अतिशयधीटआणि रोखटोक अशा अभिव्यक्तीमुळे आणि प्रखर वास्तववादी थेट चित्रणामुळे त्यांची कथा अस्वस्थही करते.

विसाव्या शतकाच्या अखेरच्या वर्षात आपल्या कथालेखनाने विशेपलक्षवेधूनघेणाऱ्यालेखिकाम्हणजेमेघनापेठे(हंस अकेला, १९९७; आंधळ्याच्यागायी, २०००) गौरी देशपांडे यांनी घडवलेला मुक्त अवकाश हा पेठे यांनाही मिळालेला वारसा आहे. त्यांच्या कथासाहित्यात रूढ नितीसंकेत आहे.निषेधगंड यापासून सहजमुक्त अशी संवेदनशीलता आढळते. तशीच स्वातंत्र्याशी जोडलेले उत्तरदायित्वाचेमूल्यस्वीकारण्याची वृत्तीही दिसून येते. स्त्रीच्या'माणूस' पणाचीखूण जपण्याचे महत्व त्यातून अधोरेखित होते. मेघना पेठे याची कथा अगदी स्वतःसारखीच, आत्मप्रत्ययुक्त, आपले वेगळेपण राखणारी अशी आहे.

स्त्रियांच्या कथासाहित्याचा विचार करताना एक गोष्ट अगदी प्रकर्षाने जाणवते की ते विविध प्रतीचे आणि जातकुळीचे असले तरी ते मुख्यतः शहरी जीवनवास्तव, शहरी स्त्रीचे भावविश्व यांच्या चित्रणातून आकारलेले आहे.

**समारोप :**

विवाहसंस्थेमुळे स्त्रीच्या वाट्याला आलेले दुःख, ही सामाजिक समस्या घेऊन बहुतेक कथालेखिकांनी कथालेखन केलेले आढळते. पारंपारिकविवाहसंस्थेने स्त्रीला पांगळे तर केले आहेच शिवायआधुनिक युगात विवाहसंस्थेमध्ये पडू पाहणारे पायंडे देखील स्त्रीला माणूस म्हणून समजून घेऊ शकत नाहीत ही खंतही व्यक्त झाली आहे. काही लेखिकांनी मात्र विवाहसंस्थेविषयी बंडखोर भूमिका घेऊन वर नाकारण्याचे अथवा स्त्रीची निर्णय क्षमता महत्वाची आहे, अशा स्वरूपाचे चित्रण

ISSN 2582-5429(online)

Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

July-September 2020 VOL.02. ISSUE II (B)

Modern Trends in Literature

(Marathi, Hindi & English)

www.aimrj.com

Email ID. aimrj18@gmail.com

केलेले आढळते. परंतु एकंदरीत विवाहसंस्था ही स्त्री विकासाचा मार्ग न ठरता स्त्रियांचे पारतंत्र्य अबाधित ठेवणारी, स्त्रीच्या स्वातंत्र्याला आडकाठी आणणारी व्यवस्था आहे. पुरुषप्रधान संस्कृतीची जोपासना करणारी व्यवस्था आहे, असे म्हणण्याइतपत नैराश्यपूर्ण चित्रण स्त्रियांच्या कथालेखनातून झालेले आढळते.

संदर्भ ग्रंथ सूची :

१)लांडे सुमती (संपा.) – 'स्त्रीवाद', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर – डिसें. २००७, पृ.६३

२) रचना माने –'स्त्रीवाद', अक्षर दालन, कोल्हापूर, डिसें. २०१३, पृ.२०

३) वंदना महाजन – 'मराठी कादंबरीतील स्त्रीवाद', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, नोव्हें. २०१०, पृ.१९

४) मंगला आठलेकर – 'लग्नसंस्थेची आवश्यकता', मिळून साऱ्याजणी, दिवाळी अंक १९९८, पृ.१३०

५) गौरी देशपांडे – 'विवाहसंस्था एक पुनर्विचार',मिळून साऱ्याजणी, दिवाळी अंक १९९८, पृ.१४३

६) अनिरुद्ध कुलकर्णी – प्रदक्षिणा खंड दुसरा कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९८, पृ.१४६-१४७

©Copyright 2020 AMRJ. All Rights Reserved